

# वर्धिष्णू

# सोशल रिसर्च & डेव्हलपमेंट सोसायटी


**त्रैमासिक**

**वर्ष १ले        अंक १ला        जानेवारी २०१८**

प्रिय सर्व,

सर्वात प्रथम तुम्हा सगळ्यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. हे येणारे वर्ष तुम्हा सगळ्यांसाठी आनंद, सुख आणि शांती घेऊन येवो हि सदिच्छा.

सहा महिन्यापूर्वी वर्धिष्णूच्या परिवारातील सगळ्यांना कामाबद्दलची माहिती मिळत राहावी या उद्देशाने  आम्ही त्रैमासिक सुरु केले. याचे सुरुवातीचे दोन अंक इंग्रजीमध्ये निघाल्यानंतर मराठीतून देखील अंक काढण्याची कल्पना समोर आली. त्यानुसार या महिन्यापासून वर्धिष्णूच्या त्रैमासिकाचा अंक इंग्रजीसोबतच मराठीमधून देखील तुम्हासगळ्यांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होतो आहे. हा अंक देखील तुम्हाला आवडेल हि अपेक्षा.

वर्धिष्णूमध्ये नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आम्ही तयारी करत असतानाच आम्हाला २ अत्यंत सुखद बातम्या मिळाल्या. पहिली म्हणजे आमचे संस्थापक-कार्यकारी संचालक अव्दैत यांना सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बरोडा येथे होणाऱ्या 'युगांतर' या राष्ट्रीय युवा परिषदेत 'unsung heroes' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा जानेवारी महिन्यात विद्यापीठाच्या प्रांगणात परिषदे दरम्यान होणार आहे. तर टीच फॉर इंडिया संस्थेच्या TFIx या उपक्रमाच्या पुढील टप्प्यात वर्धिष्णूची निवड करण्यात आली आहे.

याचबरोबर वर्धिष्णूच्या कामाची व्याप्ती वाढत असून ऑक्टोबर महिन्यात आम्ही जळगावातील समता नगर या भागात आनंदघराचे तिसरे केंद्र सुरु केले तर नोव्हेंबर महिन्यापासून Expansion आनंदघर या उपक्रमांतर्गत शिक्षक प्रशिक्षण शिबीर देशील सुरु झाले. आपल्या सगळ्यांच्या पाठबळाशिवाय हा सगळा प्रवास अशक्य होता. आपले प्रेम, सदिच्छा येणाऱ्या वर्षात देखील अश्याच आमच्या सोबत राहतील हि अपेक्षा.

वर्धिष्णूच्या त्रैमासिकाच्या मराठी अंकासंदर्भात तुम्हा सगळ्यांच्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत! पुढच्या अंकात पुन्हा भेटूच!

सस्नेह

टीम वर्धिष्णू

# या अंकात


- समता नगर येथे ३रे आनंदघर सुरु…...……………………………………………….4
- सयाजीराव गायकवाड विद्यापीठातर्फे सत्कार……………………………………………5
- TFIx या उप्रक्रमात वर्धिष्णूची निवड ……………………………………………….5
- आनंदघर येथील मुलांसाठी आरोग्य शिबिरे…………………………………………….6
- आनंदघराचा विस्तार.........................................................................................7
- कुमार निर्माण गटाचे वार्षिक कौतुक सोहळ्यात कामाची प्रस्तुती……………... ………….8
- वर्धिष्णूच्या शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन…………………………………………...8
- आनंदघरातील मुलांनी घेतला ‘५० पैकी ४७’ या नाटकाचा आस्वाद................................9
- ‘बाल साक्षरता परिषदेत कार्यकर्त्यांचा सहभाग…………………………………...10
- चिमुकल्यांच्या लेखणीतून………………………………………………………11
- चिमुकल्यांच्या लेखणीतून………………………………………………………12
- आनंदघरातून थेट........................................................................................13

# समता नगर येथे ३ रे आनंदघर सुरु

समता नगर ही जळगावातील सुमारे १०००० लोकसंख्येची वस्ती आहे. येथील लोकं हि मुख्यतः मोल-मजुरी करून जगतात. घोषित झोपडपट्टी असल्याने समता नगरमध्ये तसा चांगला पक्का रस्ता आहे, पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक नळ आहेत, बहुतांश लोकांकडे घरात संडास देखील आहे. मात्र एकूण सामाजिक परिस्थिती मात्र इतर वस्त्यांसारखीच आहे. येथे काम करणाऱ्या नितीन तायडे यांनी वर्धिष्णूला समता नगर येथे 'आनंदघर' सुरु करण्याची विनंती केली तसेच यासाठी जागा देखील उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार दि. २९ ऑक्टोबर २०१७ ला या भागातील मुलांच सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात मुख्यतः समता नगर भागातील बुध्द विहार  परिसरातील बौद्ध वाडा या भागावर लक्ष केंद्रीत करण्यात आलेलं होतं. या भागामधील एकूण ७० घरांचे सर्वेक्षण करण्यात आलं. या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश हा या भागातील शाळाबाह्य मुले शोधून काढणे हा होता.

या सर्वेक्षणातून आम्हांला असे आढळून आले कि या भागातील बहुतांश मुले ही शाळेत जात असली तरी बऱ्याच मुलांना वाचन-लिखाणात बऱ्यापैकी अडचणी आहेत, तसेच आठवी नंतर शाळा सोडण्याचे प्रमाण ही खूप आहे. या सगळया प्रक्रियेनंतर मोहन दांडगेयांनी आनंदघरासाठी या भागात असलेली बुध्द विहाराची जागा उपलब्ध करून दिली. अश्या सगळया प्रयत्नानंतर दि. ३० ऑक्टोबर २०१७ पासून समता नगर भागात आनंदघर -३ सुरु झाले.

दररोज साडे तीन तास चालणाऱ्या या केंद्रात पहिल्या दिवसापासूनच जवळपास ५० मुले येथे दररोज शिकायला येत आहेत. या मुलांना २ गटात विभागण्यात आले आहे. पहिला गट हा १ली ते ४थीचा तर दुसरा गट हा ५वी ते ९वीच्या मुला-मुलींचा आहे. याच सोबत पहिल्यांदाच वर्धिष्णूने येथे शिकवण्यासाठी याच भागातील दोन महिलांना सोबत घेतले आहे.

आर्थिक परिस्थितीमुळे येथील मुलांना शिकवणी लावणे शक्य होत नाही. १०वीत शिकणाऱ्या अश्या मुलांसाठी वर्धिष्णूने वेगळे वर्ग सुरु केले आहेत. झाकीर पटेल सर ह्यांनी या मुलांना शिकवण्याची जवाबदारी स्वीकारली आहे. समता नगर केंद्रामूळे आता  वर्धिष्णूच्या तीनही केंद्रावर मिळून १२५हुन अधिक मुलं-मुली दररोज शिकत आहेत.



# सयाजीराव गायकवाड विद्यापीठातर्फे सन्मान

सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बडोदा( गुजरात ) यांच्या वतीने दि. ११ ते १३ जानेवारी २०१८ दरम्यान "युगांतर-२०१८" ही राष्ट्रीय युवा परिषद आयोजित करण्यात आलेली आहे. या परिषदेचे उद्घाटन भारताचे माजी राष्ट्रपती मा. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते होणार आहे. तीन दिवसांच्या या परिषदेत विद्यापीठ प्रशासनातर्फे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मोजक्या लोकांना "Unsung Heroes" या शीर्षका अंतर्गत सन्मानित करण्यात येणार आहे. या मोजक्या लोकांमध्ये वर्धिष्णू संस्थेचे संस्थापक-कार्यकारी संचालक अव्दैत दंडवते यांना शिक्षण या विभागात मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे.

१३ जानेवारी २०१८ रोजी विद्यापीठातर्फे या परिषदेमध्ये हा पुरस्कार त्यांना देण्यात येईल. यासोबतच आनंदघराच्या कामाविषयीची मांडणी करण्याचीही संधी या परिषदेमध्ये मिळणार आहे. सयाजीराव गायकवाड विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ लीडरशिप ॲण्ड गवर्नन्स या विभागाने या परिषदेचे आयोजन केलेले आहे.

आपणा सगळयांच्या प्रेम, सहकार्य व प्रोत्साहनाच्या बळावर "वर्धिष्णू" ही उत्तरोत्तर प्रगती साधत आहे .हा आनंदघरातील प्रत्येक मुलाचा, वर्धिष्णू टीमचा व आपणा सगळयांचा सन्मान आहे असे आम्ही समजतो.

# वर्धिष्णूची Teach For India तर्फे राबवल्या जाणाऱ्या उपक्रमात निवड

वर्धिष्णूच्या बाबतीत नवीन वर्ष नवीन यश असेच म्हणावे लागेल. भारतातील वंचित घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने काम करणाऱ्या संस्थांमध्ये टीच फॉर इंडिया ही आघाडीची संस्था मानली जाते. सध्या भारतातील सात प्रमुख शहरांमध्ये टीच फॉर इंडियाचे काम सुरु आहे. टीच फॉर इंडियाच्या फेलोशिप अंतर्गत अनेक तरुण सरकारी शाळांमध्ये काम करीत आहेत. मात्र हे काम करत असतांना शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना स्वताची फेलोशिप सुरु करण्यास सक्षम करावे या हेतूने TFIx या उपक्रमाची सुरुवात मागच्या वर्षापासून झाली.

प्रपोजल, प्रेझेन्टेशन, वैयक्तिक मुलाखत या अश्या भल्या मोठ्या प्रक्रियेतून गेल्यावर डिसेंबर २०१७ मध्ये आम्हांला TFIx कडून अधिकृतरीत्या निवड झाल्याचे कळवण्यात आले. TFIx मध्ये निवड झालेल्या महाराष्ट्रातील मोजक्या ४ संस्थांमध्ये आता वर्धिष्णूही सामील झाली आहे.

मागील वर्षाच्या विप्रो फेलोशिप नंतर टीच फॉर इंडिया सोबत जोडल्या जाणे हा आम्ही आमचा सन्मान समजतो. TFIx च्या मदतीने २०१९ या वर्षी वर्धिष्णूची स्वताची फेलोशिप सुरु करण्याचे स्वप्न साकार होण्यास नक्कीच मदत होणार आहे. भारतातील सगळ्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या स्वप्नाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकतांना आम्हांला आनंद होत आहे.

# आनंदघरातील मुलांसाठी आरोग्यशिबिरे

वर्धिष्णू शिक्षणासोबतच लहान मुलांचे आरोग्याच्या प्रश्नावर देखील काम करते आहे. गेल्या काही काळात आमच्या असे निदर्शनास आले कि वर्षभरातील प्रत्येक ऋतू बदलानंतर खराब वातावरण निर्माण होत असल्यामुळे मुलांची प्रतिकारशक्ती कमी होऊन जंतू संसर्ग होतो. यावर्षी देखील ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात आनंदघरातील अनेक मूलं डेंगू, चिकनगुनिया, कावीळ सारख्या रोगांमुळे आजारी पडत होती त्यामुळे आनंदघरातील मुलांसाठी आरोग्याशिबीर घ्यावे असे ठरवण्यात आले.

दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी आनंदघर-१ येथे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले. डॉ. प्रशांत गर्ग यांच्या सहकार्याने पहिले शिबीर घेण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरात एकूण ५८ मुलांची तपासणी करण्यात आली. मुलांनी खूप शांत राहून या तपासणीला सहकार्य केले व तपासणी करून घेतली. यावेळी त्यांचे पालक देखील सोबत होते. तसेच ज्या मुलांना ताप जाणवत होता त्यांचे रक्त देखील तपासले गेले. तसेच ज्या मुलांना गरज होती, त्या मुलांना वर्धिष्णू तर्फे औषध, गोळया देण्यात आल्या.

त्याचप्रकारे दि.१४ नोव्हे.२०१७ बालदिनानिमित्त समतानगर येथील आनंदघर-०३ येथे वर्धिष्णू,रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्ट यांच्या सहकार्याने मुलांसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले. सुरुवातीला डॉ.सुशील राणे यांनी मुलांना हात कसे स्वच्छ धुवावे याचे मार्गदर्शन अन महत्व सांगितले. यानंतर मुलांची सामान्य आरोग्य तपासणी अन डोळ्यांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरज जहांगीर, सचिव वाणी सर यांच्या हस्ते डॉ. आनंद दशपुत्रे यांनी तयार केलेली आयुर्वेदिक औषधांचीपाकिटे देण्यात आली. या आरोग्यशिबिरात एकूण ७७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

याचबरोबर दर वर्षी अश्याच प्रकारची किमान ३ शिबिरे घ्यावीत असे देखील ठरवण्यात आले आहे.





# आनंदघराचा विस्तार

वर्धिष्णू संस्थेतर्फे आनंदघराचा विस्तार या उपक्रमा अंतर्गत दि.१० नोव्हे.२०१७ ला शाळाबाह्य मुलांसाठी काम करू इच्छिणाऱ्या जळगाव जिल्ह्यातील चोपडा व चाळीसगाव येथील शालेय संस्थेतील शिक्षक अन समविचारी मित्र यांच्यासाठी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आलेले होते. या उपक्रमाचा मुळ उद्देश हा जळगाव जिल्ह्यातील समविचारी शाळा, संस्था, संघटना यांच्या प्रतिनिधीना एकत्र आणून शाळाबाह्य मुलांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी प्रशिक्षित करणे जेणेकरून शाळाबाह्य मुलांचा शिक्षणाचा मार्ग सुखकर होईल हा आहे. या प्रशिक्षण शिबिरात शिक्षण कश्यासाठी? , आनंदघराच्या कामाची ओळख, मुल कसे शिकते, संवाद गट, documentation चे महत्व आणि पुढील कामाचा आराखडा याविषयावर संपूर्ण दिवस सत्रे घेतली गेली.



शिक्षण कश्यासाठी या सत्रात शिक्षणाचा अंतिम उद्देश काय आहे आणि शिक्षणातून काय साध्य व्हायला हवे या गोष्टीवर भर देण्यात आला. आनंदघराच्या कामाची ओळख या सत्रात आनंदघराचे मुलभूत विचार जसे कि मुलांना कुठलीही शिक्षा न करणे, आनंदघरात चालणारे कृतिकार्यक्रम जसे कि ओरिगामी आणि आनंदघरातील वातावरण या गोष्टीची मांडणी करण्यात आलेली होती. त्यानंतरच्या मुल कसे शकते या सत्रात जगभरात प्रचलित असलेले वर्तनवाद आणि ज्ञानरचनावाद या दोन पद्धतीवर संवाद साधला गेला.

संवादगट या सत्रात संवादगटाची संकल्पना आणि त्यामध्ये चर्चिले जाणारे विषय याविषयी माहिती देण्यात आली. Documentation चे महत्व आणि पुढील कामाचा आराखडा या सत्रात कुठल्याही उपक्रमामध्ये माहिती लिखित स्वरुपात संरक्षित करणे किती महत्वाचे असते यावर भर देण्यात आला होता. माहिती लिखित स्वरुपात कशी मांडावी आणि ती माहिती भविष्यात कश्याप्रकारे महत्वाची ठरते या गोष्टीविषयी सांगण्यात आले. अश्याप्रकारे हे प्रशिक्षण शिबीर उत्साहात पार पडले. तसेच वेगवेगळे विषय घेऊन यापुढे प्रत्येक महिन्याला अश्या प्रकारची कार्यशाळा आयोजित करावी असे सर्वानुमते ठरवले गेले.

# कुमार निर्माण गटाचे वार्षिक कौतुक सोहळ्यात कामाची प्रस्तुती

MKCL व सर्च, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या कुमार निर्माण उपक्रमाचा मुलांसाठीचा वार्षिक विभागीय कौतुक सोहळा ४ व ५ नोव्हेंबर २०१७ ला रोटरी भवन, महाबळ जळगाव येथे पार पडला.

MKCL, पुणे तसेच सर्च, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमानाने चालवला जाणारा कुमार निर्माण हा उपक्रम शालेय मुलांमध्ये वेगवेगळ्या कृतीकार्यक्रमामधून सामाजिक मुल्यांची रुजवणूक व्हावी या उद्देशाने संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. कुमार निर्माण मध्ये साधारण ६ ते १२ मुलांचा गट तयार केला जातो आणी या मुलांसोबत एक निमंत्रक असतो. आनंदघरातील मुलांचे देखील या उपक्रमात दोन गट आहेत.

कुमार निर्माण या उपक्रमातील मुलांसाठी वर्षाच्या शेवटी एक कौतुक सोहळा असतो, या कार्यक्रमात आनंदघरातील मुलांनी वर्षभर केलेले कृतीकार्यक्रम सांगितले. यामध्ये मुलांनी दिवाळीच्या वेळेस फटाके फोडले नाहीत आणि प्रदूषण विरहीत दिवाळी साजरा केली. दिवाळी निमित्त मुलांनी वर्धिष्णूच्या सदिच्छूकांसाठी स्वहस्ताने ग्रीटिंग कार्ड तयार केले. मुलांशी चर्चा करत असतांना मुल म्हटली कि फिरायला घेऊन चला, त्यावेळी एका मुलीने सुचवले कि तुम्ही आम्हांला बचत गल्ले आणून द्या आणि त्यात आम्ही पैसे साठवू , या साठवलेल्या पैश्यातून आपण फिरायला जाऊ असे मुलांनी सांगितले होते त्यानुसार मुलांनी या कृती विषयी कार्यक्रमात सांगितले. मुलांनी the good dinosaur हा चित्रपट बघितलेला होता. त्या dinosaur चे कुटुंब, मित्र याविषयी मुलांना वाटलेल्या जिव्हाळ्याचे प्रतिबिंब त्यांच्या बोलण्यातून उमटले. टी.व्हि. वरील एका वाहिनीवर दाखवल्या जाणाऱ्या बालवीर या मुलांना आवडणाऱ्या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन आनंदघर-१ येथील अनिता तांबे या विद्यार्थिनीने एक अनोळखी मुलीस केलेल्या मदतीविषयी सांगितले.

संपूर्ण सोहळ्यात मुलेच त्यांनी वर्षभर केलेल्या कृती कार्यक्रमांविषयी सांगत होती तर समोर बसलेली मुले त्यांना प्रश्न विचारत होती. स्टेजवर जाऊन बोलण्याने मुलांचा आत्मविश्वास देखील चांगलाच वाढला. कौतुक सोहळ्याच्या शेवटी सगळ्या मुलांना सर्टिफिकेट तसेच 'फास्टर फेणे'च्या पुस्तकांचा संच व साधना या साप्ताहिकाचा 'बालकुमार दिवाळी अंक' भेट म्हणून देण्यात आला.





# वर्धिष्णूच्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन

दि. १८ नोव्हेंबर २०१७ ला आशा फाउंडेशन , जळगाव या शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेच्या वतीने डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम इनोव्हेशन सेंटरच्या उदघाटना निमित्त जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक संस्था आणि व्यक्ती यांना आपापल्या कल्पक वस्तू, उपक्रम, प्रकल्प तसेच शैक्षणिक साहित्ययांच्या सादरीकरणासाठी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते.




या प्रदर्शनाचे आयोजन रोटरी भवन,महाबळ जळगाव येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत करण्यात आलेलं होत. प्रदर्शनात सहभागी असलेल्या प्रत्येकाला आपापल्या वस्तू, उपक्रम अथवा प्रकल्प विषयीची मांडणी करण्यासाठी प्रत्येकी एक टेबल देण्यात आलेला होता.

वर्धिष्णूने या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी शाडूमाती, क्ले माती आणि कार्डशीट पासून तयार केलेल्या वेगवेगळया वस्तू यांची मांडणी केलेली होती. वर्धिष्णूच्या कार्यकर्त्यांनी मुलांना शिकवण्यासाठी तयार केलेली काही शैक्षणिक साहित्ये तसेच वापरण्यात येणारी प्रथमची पुस्तके यांची मांडणी केलेली होती. तसेच आनंदघरातील मुलांची काही छान छान क्षणचित्रांची देखील मांडणी केली होती. या प्रदर्शनाला लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

---

# आनंदघरातील मुलांनी घेतला '५० पैकी ४७' या नाटकाचा आस्वाद

आशा फाउंडेशन, जळगाव या संस्थेने च्या वतीने रंगशिला फाउंडेशन, पुणे निर्मित "५० पैकी ४७ फक्त" या नाटकाचे आयोजन बालगंधर्व खुले नाट्य मंदिर, जळगाव येथे दि. २८ व २९ डिसेंबर २०१७ या दोन दिवशी केलेले होते. मुलांना परीक्षेत मिळणारे गुण, पालकांच्या मुलांकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा या विषयाभोवती फिरणारे कथानक असलेल्या या नाटकात शाळकरी मुलांनीच अभिनय केलेला होता .

आनंदघरातील मुलांना या नाटकाचा आनंद लुटता यावा यासाठी या नाटकाची तिकिटे आशा फाउंडेशनचे गिरीश कुलकर्णी तसेच मल्टीमिडिया फिचर्सचे सुशील नवाल यांनी वर्धिष्णूला उपलब्ध करून दिली होती. मुलांनी अभिनय केलेला असल्यामुळे आणि शालेय विषयाशी निगडीत नाटकाचा विषय असल्यामुळे मुलांना नाटक बघायला मज्जा वाटली. तसेच येथे मुख्यता सांगण्याची गोष्ट म्हणजे रोजच्या दिनक्रमातून वेळ काढून काही मुलांच्या पालकांनी देखील या नाटकाचा आस्वाद घेतला.

विशेष बाब म्हणजे वर्धिष्णूतर्फे आनंदघरातील चार मुलांच्या पालकांना या कार्यक्रमाचे ठिकाण असलेल्या बालगंधर्व नाट्यगृहाची कार्यक्रमाच्या तीन दिवसांसाठी स्वच्छता दूत म्हणून जबाबदारी दिली होती. त्यामुळे या कचरा वेचक भगिनींनी

# बालसाक्षरता परिषदेमध्ये वर्धिष्णूच्या कार्यकर्त्यांचा सहभाग

बाल साक्षरता: अर्थ व व्याप्ती ही परिषद प्रगत शिक्षण संस्था,फलटण या संस्थेने पुणे येथे दि. १ व २ डिसेंबर २०१७ या दिवशी आयोजित केलेली होती. या परिषदेमध्ये वर्धिष्णूतर्फे अव्दैत दंडवते, प्रणाली सिसोदिया आणि जगदिश बोरसे यांनी सहभाग घेतला होता.

या परिषदेत मुख्यतः अंकुरती साक्षरता या विषयावर भर देण्यात आलेला होता. मुल जेव्हा उत्स्फुर्तपणे तोंडी व लिखित भाषेचा अर्थ लावण्याचा आणि ती योग्य तऱ्हेने वापरण्याचा प्रयत्न करू लागतं त्याला अंकुरती साक्षरता म्हणतात.

शिकवण्याच्या विविध पध्दती, बोलीभाषेकाढून स्थानिक भाषेकडे होणारा प्रवास, मूल्यमापनाच्या विविध पद्धती, वाचन क्षमता विकसित कशी करावी यावर चर्चा झाली तसेच  शिक्षणाच्या क्षेत्रात सांस्कृतिक राजकारण कश्या पध्दतीने सुरु असत हे बघायला मिळालं.

## देणगीसाठी आवाहन

वर्धिष्णूच्या कामाचा व्याप जसा वाढत जात आहे तसाच त्यासाठी लागणारा पैसा देखील वाढतो आहे. आज वर्धीष्णूच्या तीनही 'आनंदघरात' मिळून १२५हुन अधिक मुलं-मुली शिकत आहेत. वर्धिष्णूव्दारा शाळेत दाखल केलेल्या विद्यार्थ्यांच्या शालेय खर्चाचा मोठा हिस्सा वर्धिष्णू उचलते. आनंदघरात शिकणारे विद्यार्थी तसेच पालक कुठलाही आर्थिक हाथभार लावण्यास असमर्थ असल्याने आम्हाला सामाजिक बांधिलकी जपलेल्या लोकांकडून मिळालेल्या सहभागावर काम अवलंबून आहे. तुम्ही देखील वर्धीष्णूच्या कामास खालीलप्रकारे हातभार लाऊ शकता.

- मुलांसोबत तुमचा वेळ घालवा व तुमच्याकडे असलेली कौशल्ये मुलांना शिकवा.
- मुलांसाठी वर्षभर लागणारी खेळणी, पुस्तके, खाऊ, शालेय खर्च, आरोग्य विषयक खर्च, जागेचे भाडे तसेच शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत.
- एका मुलाला/मुलीला शैक्षणिक वर्षासाठी दत्तक घ्या. (रु. ७०००)
- एका शिक्षकाचा महिन्याचा पगार (रु. ३०००)
- तुमच्याकडील  चांगल्या स्थितीत असलेली गोष्टीची पुस्तके, शालेय पुस्तके, खेळणी, वह्या व इतर साहित्य.

## रोख मदतीसाठी:

**वर्धिष्णू- सोशल रिसर्च & डेव्हलपमेंट सोसायटी**

**बँकेचे नाव:** दि शामराव विठ्ठल को-ऑप बँक ली.

**शाखा:** जळगाव

**A/C No.** 116503130001807

**IFS Code:** SVCB0000165

यश बालकृष्ण ढोले इ.७वी

तुळशी चे महत्व

एक होता अकबर एक होता बिरबल ते एका शेतात असेच फिरायला गेले होते मग बिरबल खुप चतुर होता बुद्धी मान होता ते पुढे गेले तेव्हा अकबर च्या पाय तुळसी च्या झाडाला लागला मग बिरबलेने अकबरला मागे ओढले बिरबल म्हणाला महाराज ये काय केल तुम्ही तुळशी च्या झाडाला तुम्ही लात मारली बिरबल म्हणाला ही माझी आई आहे अकबर म्हणाला काय ही तुळशी आई आहे तुम्ही पाया पडा अकबरला राग आला तो म्हणाला क्या तुमी मुझा राजा होऊन एका झाडाला पाया पडला लावतोस अकबरला राग आला त्यांनी ते झाड अजुन काढले थोडे पुढे गेले त्यांनी मुंग्यामुळे बिरबलने मागे ओढले बिरबल म्हणाले अरे महाराज तुम्ही काय केले तुम्ही तर मागे आमच्या आईला लात मारली आता वडिलांना लात मारली तर आता होता तर तुम्ही गेले वडिल खुप कडक आहे अकबरला अजुन राग आला ते पण झाड त्यांनी उपटून काढले त्यांच्या हाताव ते पाने लागले तेव्हा अशी मजा आली कि अकबरच्या हाताला खाजु आली ते म्हणाले किमि सांगीतले होते ते खुप कडक आहे आता फक्त आमची आई तुम्हांला वाचवु शकते मग अकबरने त्या तुळशी च्या पाया पडल्या मग बिरबलने तुळशी पाने तोडून अकबर च्या हाताला लावले तेव्हा पण तुळशी दिसते तेव्हा तेव्हा बिरबल च्या व आधी आधी अकबर पाया पडायचे.

# चिमुकल्यांच्या लेखणीतून


आलिशा आशीर शेख

माझ्या आई विषय माहिती

माझी आई खूप मेहनती आहे माझी
आई
मला खूप आवडते माझी आई मला दररोज
शाळेत पाठवते मला सकाळी लवकर उठवते
आणी आपली आई आपल्याला कष्ट करून
शाळेत आठवते आणि आपण कधी चुकी
करतो तर आई आपल्याला लागवते म्हणून
आपण कधी चुकी करत नाही
तर आई आपल्याला लागवत नाही लाडकरते
म्हणून आपण आईच ऐकायला पाहिजे
मला माझी आई खूप खूप खूप आवडते

# आनंदघरातून थेट













Visit us @ www.vardhishnu.org

Facebook:https://www.facebook.com/VardhishnuSocialResearchDevelopmentSociety/

YouTube: https://www.youtube.com/channel/UCC3fbFHMSmRURIS1gVEnUnQ

Write us at: adwaitdandwate@gmail.com

Feel Free to Call: 9890336070 / 9767488337

## टीम वर्धिष्णू



अव्दैत



जगदिश



अनिता



भावना



प्रणाली